# अनुक्रम

**प्रस्तावना । ६**
**मनोगत । ९**
गजा । १३
गोरक्ष पाटील । १७
गणू गुजले । २५
शिल्पा दऱ्याबा चव्हाण । ३१
शबाना । ३९
सुजीत : माझा मित्र । ४३
अवधूत भोसले । ४९
माणिक । ५७
जितेंद्र म्हस्के । ६७
आकाशी झेप घे रे पाखरा! । ७५
अजय-संजयची गोष्ट । ८३
चांडोलेची मुले । ९२
देवरसी । १०३
कलाकार राजेश साळुंखे । ११३
सुनेत्रा कणसे । १२३
सचिन-पल्लवी । १३५
हरीश-गिरीश । १४६

# पार्श्वभूमी

डिसेंबर २०१४ च्या सुरुवातीला रघुराज मेटकरी या पूर्णत: अनोळखी व्यक्तीकडून १५ लेखांचे एक बाड आले. धावपळ कमी झाल्यावर, निवांत वेळ मिळेल तेव्हा पाहू असे ठरवले. पण दोन-तीन वेळा त्यांच्याकडून 'वाचले का?' अशी विचारणा करणारा फोन आला. तेव्हा काहीशा अनुत्साहाने नजर टाकायला घेतले. एक-दोन लेख वाचूनच नकार कळवता येईल असे वाटले. पण आणखी एक, आणखी एक असे करत आठ-नऊ लेख वाचून संपवले. त्या दिवशी रात्री डॉ.दाभोलकरांच्यावरील लेख एका दैनिकासाठी लिहायचा होता. तो दुसऱ्या दिवशीवर ढकलला आणि उर्वरित लेख त्याच रात्री वाचून संपवले. दुसऱ्या दिवशी सकाळी रघुराज मेटकरी यांना कळवले, 'जानेवारीपासून महिन्यातून दोन वेळा 'माझे विद्यार्थी' ही लेखमाला साधना साप्ताहिकातून प्रसिद्ध करू आणि २४ डिसेंबरला साने गुरुजींची जयंती येते तेव्हा त्याचे पुस्तक साधना प्रकाशनाकडून आणू.' मेटकरी गुरुजी भरभरून आभाराचे बोलले खरे, पण त्यांचा विश्वास पूर्णत: बसला नसावा. म्हणून त्यांनी चार-पाच दिवसांनी पुन्हा फोन करून विचारले, 'आपण सर्व लेख प्रसिद्ध करणार आहोत का?' मी म्हणालो, 'हो, सर्व लेख नियमित अंकांतून... नंतर पुस्तकातून आणि 'हरीश व गिरीश' हा लेख बालकुमार दिवाळी अंकातून.' त्यांना हे सारे स्वप्नवत वाटले असावे. पण त्या लेखांचा माझ्यावरचा परिणामच असा होता की, ते तीन निर्णय एका धडाक्यात घेताना माझ्या मनात जराही संभ्रम नव्हता. आणि अर्थातच, पहिल्याच लेखापासून सर्व प्रकारच्या, सर्व स्तरांतल्या वाचकांनी ही लेखमाला डोक्यावर घेतली. ठरवल्याप्रमाणे २४ डिसेंबरला गुरुजींच्या कर्मभूमीत (अंमळनेरला) पुस्तकाचे प्रकाशनही झाले आणि त्यानंतर तीनच महिन्यांनी दुसरी आवृत्ती आली आहे.

**विनोद शिरसाठ**
साधना, संपादक

# प्रस्तावना

साने गुरुजींच्या साधना प्रकाशनाने काटेमुंढरीच्या मुनघाटे गुरुजींनंतर त्याच परंपरेच्या मेटकरी गुरुजींना महाराष्ट्रापुढे आणले आहे. 'माझे विद्यार्थी' हे पुस्तक केवळ एका शिक्षकाने काही विद्यार्थ्यांच्या लिहिलेल्या आठवणी नाहीत तर त्यापेक्षा बरेच काही आहे. म्हणजे शिक्षक-विद्यार्थी नात्यापुरतेच हे पुस्तक मर्यादित नाही, तर शिक्षक आणि समाजाचे नाते, शिक्षकाच्या कामाची कक्षा कुठपर्यंत जावी आणि सामाजिक प्रश्न व शाळांची भूमिका अशा अनेक अर्थांनी महत्त्वाचे आहे.

शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते व्यवस्थात्मकच बदलत गेले आहे. पूर्वी ऋषिकुल व्यवस्थेत सुरुवातीची १२ वर्षे विद्यार्थी शिक्षकाकडेच राहायचा, ती व्यवस्था आता ऑनलाइन कोर्सेस/होम स्कूलिंगपर्यंत आली आहे. त्यामुळे शिक्षक-विद्यार्थी नाते कोणत्या पातळीवर असावे याचे उत्तर शोधताना, हे पुस्तक एक दीपस्तंभ म्हणून महाराष्ट्राच्या शिक्षणविश्वात आले आहे. पूर्वीच्या गावव्यवस्थेत शिक्षक गावाचे शहाणपणा होता. (काटेमुंढरीची शाळा या पुस्तकाच्या प्रस्तावनेत हा मुद्दा मी विस्ताराने मांडलाय.) नव्या नागरीकरणाच्या बदलात शिक्षक खेड्यात न राहता अपडाऊन संस्कृतीत रूळलाय आणि हळूहळू शिक्षक-विद्यार्थी नाते शाळेपुरते सीमित होत गेलेय. शहरी भागातल्या शाळेतही शिक्षकी पेशा इतर नोकरीसारखा बनत गेला. त्याची अनेक कारणे असतील, पण वाढत्या नागरीकरणात शाळेच्या कवेत गाव मावत नाही हे वास्तव पुढे आले. शाळेची भूमिका गाव-शहराच्या निर्णयप्रक्रियेत मर्यादित होताना मुलांचे प्रश्न मात्र संपले नाहीत, ते अधिक गंभीर झाले.

एखादा जुना चित्रपट नव्याने काढताना त्याचे कथानक पुढे सरकत जावे, तसे मेटकरी गुरुजींच्या बाळबोध गावातील मुलांच्या वाट्याला आलेल्या त्या प्रश्नांचा